**सोने तारणावर कर्ज मागणीचा अर्ज**

# देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद.

अर्जदाराचे नाव व पत्ता ______________________ नाममात्र सभासद क्रमांक ______________

______________________

**मा. व्यवस्थापक / शाखाधिकारी** __________ शाखा सभासद क्रमांक ______________

वि.वि.

मी आपल्या बँकेचा सभासद / नाममात्र सभासद आहे मला ______________________ या कारणासाठी माझ्या पुर्ण मालकीच्या व निर्वेध अशा खाली लिहिलेल्या सोन्याच्या जिन्नसांच्या तारणावर आपल्या बँकेकडून रुपये ______________ चे कर्ज मिळावे अशी विनंती आहे.

## जिन्नसाचा तपशील

अर्जदाराने भरावयाचा तपशील सराफाने भरावयाचा तपशील (आजचा बाजारभाव रु.)

| अ. क्र. | जिन्नसाचे वर्णन | एकूण वजन | टच (कस) | निव्वळ वजन (ग्रॅममध्ये) | दर (१० ग्रॅमला) | किंमत रूपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सदर जिन्नस माझे स्वत:चे मालकीचे असून ते मी गहाण देत आहे. पैकी जे स्त्रीधन स्वरुपात आहेत त्याबाबत संबंधीत व्यक्तीच्या मान्यतेसह गहाण देत आहे, अशी मी खातरजमा देत आहे.

प्रस्तुतच्या व्यवहारासंबंधी बँकेने केलेले नियम मी वाचले व समजावून घेतले असून, त्यानुसार मी खाली सही केली आहे व त्याप्रमाणे वागण्याचे या लेखान्वये माझ्यावर बंधनकारक आहे.

आपला,

सही ______________

**अर्जदार**

---

१. दाखला देण्यात येतो की, वरील जिन्नस मी / आम्ही तपासून पडताळून पाहिले असून ते शुद्ध सोन्याचे आहेत. त्याचे वजन दर आणि कस, किंमत मी / आम्ही वर नमूद केलेल्या असून त्या बरोबर आहेत.

सही ______________

शिक्का

**सराफ**

२. सराफाने वर नमूद केलेल्या जिन्नसांचे वजन, दर व किमती आम्हास कबूल असून सदर किमतीचे प्रमाणात बँकेने मंजूर केलेली रक्कम रु.____________ मला मान्य आहे.

**अर्जदाराची सही** ____________

---

३. वर नमूद केलेल्या व सराफाने तपासुन मुल्यांकन केलेल्या एकूण रू.____________ च्या सोने जिन्नसांचे ताबेगहाण तारणावर रु.____________ (अक्षरी रु.____________ मात्र) चे कर्ज, वरील सर्व जिन्नसांबद्दल खात्री करून घेऊन, वरीलप्रमाणे मंजूर करून कर्जदारास रोख / दिली. बचत / चालू खाते क्र. ____________ मध्ये जमा केली.

दिनांक **व्यवस्थापक**

---

## स्त्री-धनाबाबत प्रतिज्ञापत्र

मा. व्यवस्थापक,

**देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद**

स. न. वि. वि.

मी ____________ पत्ता ____________

मान्यता लिहून देते की, श्री.____________ यांना माझ्या / आमच्या कौटुंबिक आर्थिक अडचणीसाठी स्त्री धन म्हणून माझ्या मालकीचे असलेले आणि या अर्जात नमूद केलेले जिन्नस बँकेकडे गहाण ठेवून, त्यावर बँकेच्या नियमाप्रमाणे मिळू शकणारे कर्ज काढण्यास व फेड न झाल्यास, जरूर तर सदर जिन्नस बँकेच्या वसुलीसाठी विकण्यास मी स्वखुशीने मान्यता देत आहे. तसेच सदर जिन्नस २००० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाच्या नाहीत आणि सदर जिन्नसा माझ्याकडे असलेल्या, सोन्याच्या जिन्नसापैकी नियमातून वगळलेल्या (Exempted Category) गटात मोडणाऱ्या आहेत याची मी खातरजमा देत आहे.

आपली विश्वासू,

दिनांक : स्वाक्षरी

---

मा. व्यवस्थापक

**देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद.**

स.न.वि.वि.

मी कर्ज मागणीच्या अर्जात गहाण म्हणून देण्यासाठी नमूद केलेल्या जिन्नसा माझ्या स्वत:च्या पुर्ण मालकीच्या आहेत. या वरील प्रमाणे मान्यता दिलेल्या अधिकारान्वये माझ्याकडे आल्या असून, सदर जिन्नसाच्या माझ्याकडे / आमचेकडे असलेल्या सोन्याच्या जिन्नसांपैकी, नियमातून वगळलेल्या गटात (Exempted Category) मोडणाऱ्या अथवा २००० ग्रॅमपेक्षा अधिक सोने नसलेल्या गटात मोडणाऱ्या आहेत, याची मी खातरजमा देत आहे.

नाव ____________ आपला विश्वासू

पत्ता ____________ ____________

स्वाक्षरी

अर्जदार

# लेटर ऑफ प्लेज

मु. ________ दि. ____________

व्यवस्थापक / शाखाधिकारी,

## देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद.

शाखा ____________________

यांसी

मी ______________________________ व्यवसाय __________ वय ________

जात __________ राहणार ______________________________ लिहून देतो ऐसा जे :-

**जिन्नसांचा तपशील**

| अ. क्र. | जिन्नसाचे वर्णन | एकूण वजन | टच (कस) | निव्वळ वजन (ग्रॅममध्ये) | दर (१० ग्रॅमला) | किंमत रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

१. मी माझ्या स्वत:च्या मालकीच्या व निर्वेध अशा वरील तपशीलाच्या जिन्नसा आपल्या बँकेकडे तारण देऊन त्यावर आपणाकडून कर्ज रू. __________ (अक्षरी ______________________ फक्त) घेतले आहे व सदर रकमेची वचन चिठ्ठी स्वतंत्रपणे लिहून दिली आहे. सदर रकमेस व्याज दरसाल दर शेकडा (________%) अगर बँक आणि भारतीय रिझर्व्ह बँक वेळोवेळी ठरवेल त्या व्याजाच्या दराने दरमहा बँकेचे नियमाप्रमाणे देत जाईन. सदर कर्जाची मुदत बारा महिने राहील. मुदतीनंतर व्याजासह सर्व रक्कम देऊन, वरील जिन्नस परत घेईन. रक्कम भरण्यास कसूर झाल्यास, बँकेने गहाण जिन्नसाची विक्री करून व्याजासह सर्व रकमेची भरती करून घेण्यास माझी / आमची हरकत राहणार नाही. रक्कम कमी पडल्यास रकमेची भरती जातीने करून देऊ. बाजारभावातील चढउतारामुळे फरकाची रक्कम कमी पडल्यास, आपण मागाल तसतशी रक्कम भरती करून देत जाऊ. फरकाच्या रकमेचा वक्तशीर भरणा न झाल्यास किंवा जिन्नस ठरलेल्या मुदतीत सोडवून न नेल्यास वरील गहाण जिन्नसांची विक्री करण्यास आपणास (बँकेस) मोकळीक आहे. जिन्नसांचे विक्रीतून व्याजासह बँकेचे देणे न भागल्यास, मी जातीने सर्व रक्कम देईन. दरमहा अखेरीस होणारे व्याज चुकते करीन. तसे न केले तर होणाऱ्या आढाव्यावर वरील दराप्रमाणे चक्रवाढ व्याज देईन.

२. मी बँकेचा सभासद / नाममात्र सभासद असून, बँकेचे पोटनियम व व्यवहाराबाबतचे सर्व नियम व अटी मी वाचून समजावून घेतल्या असून, त्या मजवर बंधनकारक आहेत व त्याचप्रमाणे मी वागण्याचे कबूल करतो.

३. सदर जिन्नस माझे स्वत:च्या मालकीचे आहेत, अशी खातरजमा मी देत आहे. त्यामुळे सदर जिन्नसाच्या मालकी हक्काबद्दल व तत्स्वरुपाचा कोणताही कायदेशीर वाद उपस्थित झाल्यास, त्या बाबतची संपूर्ण जबाबदारी माझेवर राहील आणि त्याबाबत कायदेशीर वा आर्थिक बोजा बँकेवर पडू न देता माझ्या स्थावर जंगम मिळकतीमधून सदर रक्कम वसूल करण्याचा अधिकार बँकेस राहील, हे मला मान्य आहे.

४. जिन्नस मिळण्याबद्दल बँकेने दिलेली पावती क्र. __________ मला मिळाली.

५. ह्या व्यवहाराचा उलगडा करण्याचा प्रसंग दुदैवाने माझ्या हयातीनंतर आल्यास माझे जिन्नस या लेखान्वये श्री./सौ. ______________________ व्यवसाय __________ वय ________ जात __________ पत्ता ______________________ यांचेकडून बँकेचे सर्व येणे प्रथम वसूल करून घेऊन, नंतर त्यास देऊन पावती घ्यावी म्हणजे माझे वाली / वारस यांना जिन्नसाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार करण्याचा अधिकार राहणार नाही.

आपला,

सही ____________________

वर लिहिलेले सर्व जिन्नस मला व्यवस्थितपणे परत मिळाले असून जिन्नसांच्या वजन-मापाबद्दल अथवा कोणत्याही स्वरुपाची माझी तक्रार नाही.

दिनांक : अर्जदाराची सही

# देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद.

## सोने तारण कर्ज नियम

१) सोने जिन्नसांचे तारणावर कर्ज घेणारी व्यक्ती ही बँकेची सभासद अथवा नाममात्र सभासद असणे वा होणे आवश्यक आहे. कर्ज रकमेची कमाल मर्यादा ठरविण्याचे अधिकार बँकेस राहतील.

२) सोन्याचे जिन्नसांचे तारणावर कमीत कमी रु. ५०००/- व त्यापुढे १०० च्या पटीत कर्ज देता येईल.

३) सोन्याचे जिन्नसांचे बाबतीत बँकेनी नेमलेल्या अधिकृत सराफाने केलेल्या किंमतीच्या ६० टक्केपर्यंत किंवा वेळोवेळीच्या बँक धोरणाप्रमाणे कर्ज दिले जाईल. सदर मुल्यांकनाचे देयक कर्जदारास द्यावे लागेल.

४) या कर्जावर कर्ज घेते वेळी बँकेचा जो प्रचलित व्याजदर असेल त्या दराने कर्ज खात्यावर दरमहा व्याज नावे टाकले जाईल, असे व्याज नावे टाकल्या गेल्यापासून पंधरा दिवसाचे आत भरणे आवश्यक आहे अन्यथा सदर व्याज मुद्दलात समाविष्ट करून त्यावरही आकारणी केली जाईल. बँके / रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार होणारे व्याज दरातील बदल वेळोवेळी या कर्ज प्रकरणी ही लागू होतील.

५) कर्जदाराने कर्ज घेतल्यापासून एक महिन्याचे आत व्यवहार पूर्ण केल्यास व्याजापोटी कमीत कमी एक रुपया अथवा कर्ज रकमेवरील एक महिन्याचे व्याज यामध्ये जास्त असणारी रक्कम भरावी लागेल.

६) कर्जदारास कर्जाबाबत बँकेच्या नावाने डिमांड प्रॉमिसरी नोट लिहून द्यावी लागेल व अन्य करारपत्राची पुर्तता करून द्यावी लागेल.

७) सदर कर्जासाठी तारण दिलेल्या जिन्नसा बँकेच्या ताब्यात मिळाल्यावर बँक त्याची पोच देईल. ही पोच पावती खाते बंद करताना परत केली पाहिजे. तसेच शाखाधिकाऱ्यास आवश्यक वाटल्यास कर्जदारास ओळख द्यावी लागेल. अन्यथा तारण जिन्नस परत देणे वा न देण्याचा अधिकार बँकेस राहील. पावती हरविल्यास विहित नमुन्यात योग्य स्टॅम्पपेपरवर हमीपत्र द्यावे लागेल.

८) बँकेकडे दिलेल्या जिन्नसांचे बाजार भावात उतार झाल्यास कर्जाची रक्कम व तारण जिन्नसांची किंमत यांचे ठरलेले प्रमाण कायम ठेवण्यासाठी अधिक तारण मागविण्यासाठी अथवा रक्कम भरण्यासाठी कर्जदारास बँक नोटीस देईल. अशी नोटीस दिल्यानंतर कर्जदाराने अधिक तारण दिले नाही अथवा दिलेल्या मुदतीमध्ये रकमेचा पूर्ण भरणा केला नाही तर तारण जिन्नस ओपन सेलने विकून कर्ज भागवून घेणेचा अधिकार बँकेस राहील, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

९) रु. २.०० लाखाच्या आतील कर्जाची परतफेड १२ महिने मुदतीच्या आत, व्याजासह एक रकमी तर रु. २.०० लाखाच्या पुढील कर्जरक्कम बँकेने ठरवून दिलेल्या मुदतीत मासिक हप्त्याने भरणा करण्यास बांधील आहे.

१०) हे कर्ज डिमांड लोन म्हणून समजले जाईल. आगाऊ ७ दिवसांची नोटीस देऊन कर्जाची फेड कर्जदाराकडून न झाल्यास अगर खातेवर खर्च पडलेल्या व्याजाची रक्कम नोटीस देऊन वसूल न झाल्यास अथवा बाजारभाव उतरल्यामुळे बँकेने मागविलेली रक्कम अथवा अधिक तारण मुदतीत न भरल्यास तारण जिन्नस विकून कर्ज भागवून घेण्याचा अधिकार बँकेस आहे. तारण जिन्नस विक्री बाबतचा व कोणत्याही कारणाने रजिस्टर नोटीस पाठवावी लागल्यास तिचा व अशा स्वरुपाचा सर्व खर्च कर्जदाराच्या खात्यावर नावे टाकला जाईल. तारण जिन्नस विकून येणाऱ्या रकमेपैकी कर्जफेड होऊन जास्त रक्कम राहिल्यास ती कर्जदारास परत केली जाईल मात्र त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही व कमी असल्यास तेवढ्या रकमेबद्दल कर्जदारास व्यक्तीश: जबाबदार धरून त्याचेकडून सदर रकमेचे व्याज मुद्दलासह वसुल केले जाईल.

११) कर्जदाराने तारण दिलेल्या जिन्नसांवरील कर्जाखेरीज कर्जदार अन्य तऱ्हेने बँकेचे काही देणे लागत असल्यास त्याकरिता हे जिन्नस तारण म्हणून राखून ठेवण्याचा अधिकार बँकेस राहील, यास माझी / आमची संमती आहे.

१२) सदर नियमामध्ये वेळोवेळी आवश्यक ते बदल दुरूस्ती इ. करण्याचे अधिकार बँकेस राहतील. असे होणारे व झालेले बदल बँकेच्या सूचना फलकावर लावणेत येतील ते कर्जदार म्हणून माझेवर बंधनकारक राहतील.

अर्जदाराची सही

नाव ______________________

कलम नंबर ____________

खाते पान क्र. ____________

# देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद.

शाखा ____________ औरंगाबाद.

दिनांक

श्री/सौ. ____________ यांस पावती देण्यात येते की, आपण खालील सोन्याचे जिन्नस बँकेकडे तारण ठेवून बँकेकडून रु. ____________ अक्षरी रु. ____________ कर्ज घेतले आहे. सदर कर्जफेडीची मुदत १२ महिने आहे आपले कलमाचा नंबर ____________ आहे. जिन्नस सोडविण्याचे वेळी पावती परत द्यावी.

| अ.क्र. | जिन्नसाचे वर्णन | एकूण वजन | टच (कस) | निव्वळ वजन (ग्रॅममध्ये) | दर (१०ग्रॅमला) | किंमत रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

मुदत संपण्याचा दिनांक

देवगिरी नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद करिता

**शाखाधिकारी**

**वरिलप्रमाणे तारण ठेवलेल्या जिन्नसांचा तपशील बरोबर असून, त्याबाबत बँकेकडून पावती प्राप्त झाली.**

**स्वाक्षरी**

# संमतीपत्र

**(सोने तारण कर्जा संबंधात घ्यावयाचे)**

मी ____________________ वय ________ वर्षे, पत्ता ____________________ ____________________ येथील राहणार असून आज रोजी मी आपल्या बँकेकडून सोबत लिहून दिलेल्या करारात नमूद केल्याप्रमाणे रु.________/- सोने जिन्नस तारणावर कर्ज मागणी केल्यानुसार मला रु.____________ /- चे कर्ज मंजूर करण्यात आले आहे, मी तारण दिलेल्या सोने जिन्नसा संदर्भात असे नमूद करतो की,

१) तारण दिलेल्या सोने जिन्नसात काही नाजूक / कलाकुसरीचे दागिने आहेत.

२) तारण दिलेल्या सोने जिन्नसामध्ये बँकेत उपलब्ध असलेल्या पिशवीच्या क्षमतेपेक्षा जास्त दागिने आहेत.

३) नाजूक व कलाकुसरीच्या दागिन्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी माझ्याकडे डबा/डबी नसल्याने बँकेकडे दिलेली नाही.

**(लागू असेल त्यावर बरोबरची खूण करावी.)**

त्यामुळे तारण सोने जिन्नसाची बँकेत उपलब्ध असलेल्या साधनांच्या सहाय्याने योग्यरितीने देखभाल व्हावी तसेच हाताळणीस सुलभ जावे यादृष्टीने बँकेने त्यांच्या सोयीनुसार वेगवेगळ्या पिशव्यात सीलबंद करण्यास आमची कोणत्याही प्रकारची हरकत नाही. तसेच सदर संमतीमुळे तारण दिलेले सोने जिन्नस बँकेने आवश्यकतेनुसार एका पेक्षा जास्त पिशव्यात सीलबंद केल्यामुळे प्रती बॅग / प्रती वर्ष नियमानुसार आकारण्यात येणारे कस्टडी चार्जेस भरण्यास मी तयार आहे. बँकेने अशा रक्कमा माझ्या कर्ज खात्यास नावे टाकून वसूल केल्यास त्यासही माझी कोणत्याही प्रकारची हरकत असणार नाही.

तसेच तारण दिलेल्या सोने जिन्नस रक्कमेवर बँकेने नियमानुसार आकारलेले प्रती वर्ष / प्रती हजारी विमा चार्जेस भरण्यासही मी तयार आहे. बँकेने अशा रक्कमा माझ्या कर्ज खात्यास नावे टाकून वसूल केल्यास त्यासही माझी कोणत्याही प्रकारची हरकत असणार नाही.

उपरोक्त क्र. ३ च्या विधानात नमूद केलेल्या गैरसोईमुळे जर बँक कर्मचारी / तपासणी अधिकारी यांनी योग्य ती खबरदारी घेऊनही जर, त्यांच्या हातून पिशव्यांची हाताळणी करतांना दागिने किंवा त्याचा एखादा भाग तुटल्यास / त्यास कोणत्याही प्रकारे हानी पोहोचल्यास त्यास बँक अथवा त्यांचे कर्मचारी / तपासणी अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. याचीही मला संपूर्ण जाणीव आहे.

उपरोक्त संमतीपत्र मी आज रोजी माझ्या स्वखुशीने लिहून दिलेले आहे व ते मजवर कर्जाची संपूर्ण व्याजासह परतफेड करेपर्यंत व भविष्यातही बंधनकारक राहील.

कर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :- / / २०

(नाव ____________________ )